# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### रामटेक (जि.नागपूर) येथील शासकीय आदिवासी मुलांच्या वसतिगृहात सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१) १५१८९ (२७-०४-२०१६). प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक (जि.नागपूर) येथील शासकीय आदिवासी वसतिगृहात किती विद्यार्थी राहतात व त्यांचे जेवण व अल्पोपहार याचा ठेका कोणास देण्यात आला आहे,

(२) असल्यास, सदर वसतिगृहात सोयीसुविधांचा अभाव असून गृहपाल वसतिगृहात उपलब्ध रहात नसल्याची तक्रार करण्यात.आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विष्णु सवरा (२२-०५-२०१८) :** (१) आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, रामटेक (जि.नागपूर) येथे एकूण ८३ विद्यार्थी राहतात व त्यांचे जेवण व अल्पोपहार याचा ठेका श्री.निरज विश्वनाथ गुप्ता, सेंट्रल एव्हयुनी रोड, नागपूर यांना देण्यात आलेला आहे.

(२) व (३) वसतिगृहात सोयीसुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत.

वसतिगृहातील विद्यार्थ्यांना शासन निर्णयातील तरतूदीनुसार आवश्यक शैक्षणिक साहित्य, निर्वाह भत्ता यांचे वाटप करण्यात आलेले आहे.

सदर वसतिगृहाचे गृहपाल हे सतत गैरहजर रहात असल्याचे निदर्शनास आल्याने त्यांच्या दोन वेतनवाढी थांबविण्यात आलेल्या आहेत.

---

## मुंबईतील कनिष्ठ महाविद्यालयांनी फी वाढ करण्याचा घेतलेल्या निर्णयाबाबत

**(२) १९७७७ (२३-०८-२०१६). श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सुमारे १८ कनिष्ठ महाविद्यालयांनी ४० टक्के फी वाढ करण्याचे प्रस्ताव शिक्षण उपसंचालकाकडे माहे एप्रिल, २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात मजुरीसाठी पाठविण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांवर फी वाढीचा जादा बोजा पडू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली आहे ?

**श्री.विनोद तावडे (०७-०६-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

मुंबई महानगर क्षेत्रातील १४ कनिष्ठ महाविद्यालयांनी इ. ११ वी च्या विज्ञान, वाणिज्य व व्दिलक्षी (बायफोकल) या शाखातील अभ्यासक्रमांच्या फी मध्ये वाढ केली आहे. याबाबतचे प्रस्ताव शिक्षण उप संचालक यांचेकडे सादर झालेले नाहीत.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) सन २०१६-१७ च्या इयत्ता ११ वी मध्ये ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया माहितीपुस्तिकेत कनिष्ठ महाविद्यालयाच्या पुढे अनुदानित / कायम विनाअनुदानित / स्वयंअर्थहाय्यित असे प्रकार नोंदविण्यात आले आहेत. त्यानुसार त्यांची फी व मागील वर्षाचा कटऑफ दर्शविण्यात आला आहे.

विदयार्थी कनिष्ठ महाविदयालयांची निवड करताना या बाबी विचारात घेवूनच कनिष्ठ महाविद्यालयांची पसंती क्रमांक नोंदवितात. त्यामुळे विदयार्थ्यांवर फी वाढीचा जादा बोजा पडत नाही.

---

**परभणी जिल्हयातील आरोग्य विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३) १९९५४ (११-०८-२०१६). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील आरोग्य विभागातील ५५७ पदांपैकी १४२ पदे तसेच रूग्णालय अधिक्षकांची पदे, नेत्र शल्य चिकित्सक व इतर महत्वाची पदे रिक्त असल्याने इतर कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरीक्त भार वाढत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१६-०५-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

परभणी जिल्हा रुग्णालय व अधिनस्थ आरोग्य संस्थेत ९४३ पदे मंजूर असून २५० पदे रिक्त आहेत.

(२) वर्ग १ व वर्ग २ चे पदे भरण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावरुन सुरु आहे. तसेच वर्ग ३ व वर्ग ४ ची पदभरती प्रक्रिया पूर्ण झाली असून निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अहमदनगर शहरातील रिक्षांना परमिट देण्याबाबत**

**(४) २२५४३ (१६-०८-२०१६). श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर शहरात सन १९९७ पासून रिक्षा परमिट देणे बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परमिट देण्याबाबत शासनाचे धोरण काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार रिक्षा परमिट देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते (११-०५-२०१८) :** (१) व (२) शासनाने दिनांक २६/११/१९९७ च्या अधिसूचनेव्दारे राज्यातील मुंबई शहरात चालविण्यात येणाऱ्या टॅक्सी व मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर, सोलापूर, नाशिक व औरंगाबाद या शहरातील ऑटोरिक्षांची संख्या त्या दिनांकापर्यंत सिमीत करण्याचा निर्बंध घातला होता.उक्त अधिसूचनेस अनुसरून राज्यातील उर्वरित क्षेत्रात नव्याने ऑटोरिक्षा परवाने जारी करण्याबाबत राज्य परिवहन प्राधिकरणाने निर्बंध घातले होते.

शासनाने दिनांक १७/०६/२०१७ रोजीच्या अधिसूचनेन्वये दिनांक २६/११/१९९७ च्या अधिसूचनेव्दारे घातलेले निर्बंध रद्द करण्याचा निर्णय घेतला. तसेच शासनाने दिनांक २२/०९/२०१७ च्या शासन निर्णयान्वये राज्य परिवहन प्राधिकरणाव्दारे घातलेले निर्बंधाबाबतचे सर्व संबंधित ठराव रद्द करण्यात आले आहेत. तसेच दिनांक १८/०७/२०१७ चे शासन निर्णयान्वये नवीन टॅक्सी/ऑटोरिक्षा परवाने देण्यासंदर्भात अटी व शर्ती विहीत केलेल्या आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिल्हा रुग्णालय, बीड येथील कर्मचाऱ्यांना वेतनापासून वंचित ठेवल्याबाबत

**(५) २२६०५ (२०-०८-२०१६). श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्मचाऱ्यांच्या बदलीला न्यायालयाने स्थगिती दिल्यामुळे दिनांक १० सप्टेंबर, २०१५ रोजी उपजिल्हा रूग्णालय, केज येथून जिल्हा रुग्णालय, बीड येथे शिपाई या पदावर रूजू होवूनही या कर्मचाऱ्यास अद्याप वेतन अदा करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केवळ वरिष्ठांच्या मर्जीनुसार बदलीच्या ठिकाणी रूजू न झाल्यामुळे पूर्वग्रह दूषितपणे संबंधित कर्मचाऱ्यास वागणुक दिल्यामुळे या कर्मचाऱ्याला वारंवार मागणी करूनही वेतन मिळाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा रूग्णालयातील अनेक कर्मचारी व अधिकाऱ्यांना वरिष्ठांकडून जाणीवपूर्वक त्रास देण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत असल्याच्या तक्रारी होवूनही दोषीविरूध्द शासनाने कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रूग्णालयातील कर्मचाऱ्यांना बेजबाबदारपणे वागणुक देणे, त्यांचा छळ करणे, मारहाण व धमकावणे अशा स्वरुपाच्या प्रकरणांत शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१५-०५-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) हे खरे नाही.

सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे. तथापि, तत्कालिन जिल्हा शल्य चिकित्सक यांची बीड येथून बदली करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

**रस्ते सुरक्षा करामध्ये वाढ करुन त्यात रस्ते सुरक्षा निधी अधिभार लावण्याचा निर्णयाबाबत**

**(६) २४१०९ (३०-१२-२०१६). प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रस्ते सुरक्षा करामध्ये वाढ करुन त्यात रस्ते सुरक्षा निधी अधिभार लावण्याचा निर्णय शासनाने माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाहन नोंदणी करतांना शासनाकडून अनेक प्रकारचे कर घेतले जात असतांना हा नवा कर लावण्याचे कारणे काय आहेत,

(३) असल्यास, रस्ते सुरक्षा निधी अधिभार लावू नये अशी मागणी अनेक सामाजिक संस्थांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते (११-०५-२०१८) :** (१), (२), (३) व (४) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या रस्ता सुरक्षा समितीने दिलेल्या निर्देशानुसार दिनांक ०१/०९/२०१६ च्या शासन निर्णयान्वये रस्ता सुरक्षा निधी निर्माण करण्यात आलेला असून सदरचा निधी राज्यातील रस्ते अपघात नियंत्रणात आणण्यासाठी उपाययोजना करण्याच्या कार्यक्रमासाठी करावयाचा आहे. सदरच्या निधीकरीता राज्यातील नविन नोंदणी होणाऱ्या वाहनांवर उपकराच्या स्वरूपात अतिरिक्त मोटार वाहन कर लावण्यात येवून निधी संकलीत करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या मृत्यू प्रकरणी त्रिस्तरीय समिती नेमण्याबाबत**

**(७) २७५६५ (१२-०४-२०१७). श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, ॲड. निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकिय अनुदानित आश्रमशाळेत भविष्यात विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या मृत्यूची दखल घेण्यासाठी त्रिस्तरीय समिती नेमण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१७ च्या पहिल्या सप्ताहात घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विष्णु सवरा (१८-०५-२०१८) :** (१), (२) व (३) विद्यार्थी मृत्यूचा अभ्यास करण्यासाठी शासनाने डॉ.सुभाष साळुंखे, निवृत्त आरोग्य महासंचालक यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. सदर समितीच्या शिफारशीनुसार विद्यार्थ्यी मृत्यू प्रकरणाची तातडीने दखल घेऊन प्राथमिक चौकशी करणे, विद्यार्थी मृत्यूचे वैद्यकीय सामाजिकदृष्टीने विश्लेषण करणे, मृत्यू प्रकरणांची जबाबदारी त्वरीत निश्चित करणे इत्यादी प्रयोजनांसाठी आदिवासी विकास विभागाच्या दिनांक २८/१२/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये १) अपातकालीन आढावा गट, २) वैद्यकीय सामाजिक आढावा समिती व ३) जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीची स्थापना करण्यात आली असून त्यानुसार अपर आयुक्त, नाशिक/ ठाणे/ अमरावती/ नागपूर या ठिकाणी सदर समित्या गठीत करण्यात आल्या आहेत.

---

## नगरदेवळा ग्रुप ग्रामपंचायतीच्या (जि.जळगांव) घरांच्या नोंदीप्रमाणेच भूमापन (सिटीसर्व्हे) कार्यालयाने नोंदी करण्याबाबत

**(८) २९६०४ (१५-०४-२०१७). श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगरदेवळा ग्रुप ग्रामपंचायतीच्या (जि.जळगांव) घरांच्या नोंदी प्रमाणेच भूमापन (सिटीसर्व्हे) कार्यालयाने नोंदी करावे याबाबत अशोक भावसार यांनी मा.सहकार राज्यमंत्री यांना लेखी निवेदन दिनांक २९ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील (१५-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी सन-१९७८ ते १९८८ च्या काळात नगरदेवळा गावास नगर भूमापन योजना लागू करण्यात आली. त्यावेळी तेथील काही धारकांनी नगर भूमापन हद्दीतील मिळकतींच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारात खरेदी खताच्या दस्तामध्ये नगर भूमापन क्रमांक नमूद करण्याऐवजी ग्रामपंचायत मिळकत क्रमांक नमूद केले आहे. त्यामुळे खरेदी-मिळकतींचे वर्णन नगर भूमापन क्रमांकाशी जुळत नाही. तरी सदर गावास ग्रामपंचायत मिळकतीप्रमाणे नोंदी घेण्याबाबत खालीलप्रमाणे पर्याय उपलब्ध आहेत.

(अ) जिथे केवळ ग्रामपंचायत क्रमांक नमूद आहे. मात्र, नगर भूमापन क्रमांक नमूद नाही, अशा ठिकाणी प्रत्यक्ष जागेवर पाहणी करुन धारक, क्षेत्र इत्यादी नगर भूमापन अभिलेखाशी जुळत असल्यास, त्याची नियमाप्रमाणे नोंद घेता येईल.

(ब) जेथे ग्रामपंचायत नंबरप्रमाणे खरेदीखत केले आहे व अभिलेखाप्रमाणे मिळकत पत्रिकेतील क्षेत्र आणि नकाशा धारकास मान्य असल्यास व त्याप्रमाणे त्यांनी नोंदणीकृत विधीवत दुरुस्ती लेख करुन आणल्यास, त्याची महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४९, १५० अन्वये नोंद घेता येतील.

(क) जेथे ग्रामपंचायत मिळकत क्रमांक व नगर भूमापन क्रमांक याचे वर्णनातील धारक, नकाशाची आकृती, क्षेत्रफळ व चुत:सिमा मान्य नसल्यास, त्याठिकाणी महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १०६, २४७ व २५७ च्या तरतुदीनुसार जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख यांच्याकडे संबंधित धारकाने अर्ज करुन रितसर दाद मागणी करु शकतात.

प्रस्तुत प्रकरणात निवेदनकर्ता यांना त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने उप अधिक्षक भूमि अभिलेख, पाचोरामार्फत लेखी उत्तर कळविण्यात आलेले आहे.

---

## बीड जिल्हयातील ऊसतोड कामगारांच्या पाल्यासाठी सुरू असलेल्या अनिवासी वसतिगृह चालकांना अनुदान वितरीत करण्याबाबत

**(९) ३०५८१ (१५-०४-२०१७). श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयातील ऊसतोड कामगारांच्या पाल्यासाठी सुरू असलेल्या अनिवासी वसतिगृह चालकांना अनुदानापोटी एक रूपयाही देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्हयातील ऊसतोड कामगारांच्या पाल्यासाठी सुरू असलेल्या वसतिगृहांची संख्या व प्रवेश घेतलेल्या कामगारांच्या पाल्यांची संख्या किती आहे,

(३) असल्यास, सदरील वसतिगृह चालकांचे अनुदान वितरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे (१८-०७-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) बीड जिल्हयातील ऊसतोड कामगारांच्या पाल्यांसाठी सुरु असलेल्या वसतिगृहांची संख्या ६४१ असून, प्रवेश घेतलेल्या कामगारांच्या पाल्यांची संख्या ३९३४१ इतकी आहे.

(३) सदर वसतिगृहे शाळा व्यवस्थापन समिती चालवित असून, दिनांक ३१/०३/२०१७ रोजी RTGS द्वारे अनुदान वितरीत करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## येवला व निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा डिजिटल करण्याबाबत

**(१०) ३१८६४ (११-०८-२०१७). श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येवला व निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील ३१४ जिल्हा परिषद शाळा डिजिटल करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याची मागणी नाशिक जिल्हा परिषदेकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २० जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनास प्रस्ताव प्राप्त झाला आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन लोकप्रतिनिधींनी मागणी केल्यानंतर सुमारे दिड वर्षापासून सदर मागणीवर कार्यवाही न केल्याप्रकरणी संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे (२०-०४-२०१८) :** (१) होय.
(२) सदर प्रकरणी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प नाशिक या कार्यालयाच्या दिनांक २ जून, २०१७ च्या पत्रान्वये जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या कार्यालयास, सदर जिल्हा परिषद शाळांसाठी अनुदान उपलब्ध करणेबाबत कार्यवाही होणेसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे.
(३) येवला गटातील एकूण २३६ जिल्हा परिषद शाळांपैकी, २३२ शाळा डिजिटलायजेशन झालेल्या आहेत व उर्वरित ४ शाळा समाज सहाभागातून गट शिक्षणाधिकारी (तालुका) स्तरावर प्रस्तावित आहेत.

तसेच, निफाड गटातील एकूण २३५ जिल्हा परिषद शाळांपैकी, २०७ शाळा डिजिटलायजेशन झालेल्या आहेत व उर्वरित प्रलंबित शाळांपैकी, २८ शाळा समाज सहाभागातून गट शिक्षणाधिकारी (तालुका) स्तरावर प्रस्तावित आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भंडारा जिल्हयातील पुनर्वसन विभाग चंद्रपूर जिल्हयात स्थलांतरीत करण्यात येत असल्याबाबत**

**(११) ३२९६४ (०७-०८-२०१७). श्री.परिणय फुके :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयातील स्थानिक नागरिकांचे पुनर्वसन न करताच भंडारा जिल्हयातील पुनर्वसन विभाग चंद्रपूर जिल्हयामध्ये स्थलांतरीत करण्यात येणार असल्याचे माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील (१८-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

जिल्हा पुनर्वसन अधिकारी, भंडारा यांचे कार्यालय भंडारा येथेच स्थित आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शासकीय व निमशासकिय कार्यालयात आरक्षणानुसार अपंगांची भरती करण्याबाबत

**(१२) ३५७४८ (०२-०१-२०१८). श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्व शासकीय व निमशासकिय कार्यालयात उपलब्ध असणाऱ्या जागांपैकी अपंगाच्या कल्याणासाठी ३ टक्के जागा अपंगाच्या नोकरीसाठी आरक्षित करण्यात येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कायद्यान्वये शासकीय व निमशासकिय कार्यालयांमध्ये सदर कायद्याची अंमलबजावणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) नसल्यास, सदर कार्यलयामध्ये उपलब्ध होणाऱ्या सर्व जागा अपंग आरक्षणानुसार भरती करणेबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.राजकुमार बडोले (०५-०५-२०१८) :** (१), (२) व (३) अपंग व्यक्ती अधिनियमांतील तरतूदीच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयान्वये शासन सेवेत अपंगासाठी ३ टक्के आरक्षण विहित करण्यात आलेले आहे. त्यानुसार सर्व प्रशासकीय विभागामार्फत अपंगासाठी ३ टक्के आरक्षण ठेवण्याबाबतची कार्यवाही करण्यात येते.

शासन सेवेतील अपंगासाठी आरक्षित ठेवण्यात आलेली पदे भरण्याच्या अनुषंगाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत सर्व प्रशासकीय विभागांकडे पाठपूरावा करण्यात येत आहे.

---

## राज्यात स्वतंत्र वन विद्यापीठ सुरु करण्याबाबत

**(१३) ३६१५७ (०२-०१-२०१८). श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्वतंत्र वन विद्‌यापीठ सुरु करण्याची लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वने व पर्यावरणाचा अभ्यास करणारे विद्‌यार्थी व संशोधकांना अभ्यासाची संधी मिळण्यासाठी स्वतंत्र वन विद्‌यापीठ स्थापन करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (२३-०५-२०१८) :** (१) होय.
(२) लोकप्रतिनिधींच्या सदर मागणी संदर्भात स्वंयस्पष्ट अभिप्रायासह अहवाल सादर करण्याबाबत प्रधान मुख्य वन संरक्षक, नागपूर यांना कळविण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई विद्‌यापीठातील हंगामी कर्मचाऱ्यांनी आंदोलन केल्याबाबत

**(१४) ३६५९७ (०२-०१-२०१८). श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्‌यापीठातील हंगामी कर्मचाऱ्यांनी आपल्या प्रलंबित मागण्याकरीता माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान आंदोलन केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांचे स्वरुप काय आहे, त्यावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे (०७-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदरहू हंगामी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांचे स्वरुप हे पगारवाढ, रजा (नैमित्तीक/ वैद्‌यकीय/ प्रसुती), ओळखपत्र, उत्सव अग्रिम, कर्मचाऱ्यांचे विभागीय बायोमॅट्रिक्स करणे, सुरक्षा रक्षकांच्या गणवेशाबाबत, इ. मागण्या होत्या. सदर कर्मचाऱ्यांच्या संघटनेने मा.औद्‌योगिक न्यायालयामध्ये देखील

विविध मागण्यांसाठी दाखल केलेल्या याचिकांमध्ये मा.औद्यागिक न्यायालयाने कोणत्याही हंगामी कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत घेता येणार नाही असा निर्णय माहे जानेवारी, २०१८ मध्ये दिलेला असून इतर मुद्यांबाबतची योग्य ती कार्यवाही विद्यापीठाकडून सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोंढवा (जि.पुणे) येथील वक्फ बोर्ड जमिनीच्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत**

**(१५) ३६९७१ (०२-०१-२०१८). श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३२३७२ ला दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोंढवा (जि.पुणे) येथील सर्व्हे क्र. ५५ मधील वक्फ बोर्डाच्या मालकीची असलेली जमीन परस्पर खाजगी विकासकाला विकण्यात येऊन त्यात करण्यात आलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री यांनी दिले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणाबाबत चौकशी करण्याचे आदेश प्रादेशिक वक्फ अधिकारी, पुणे यांना देण्यात आले असून त्यांच्याकडून अहवाल प्राप्त झाला आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार वक्फ बोर्डाच्या मालकीच्या जमिनीचा परस्पर गैरव्यवहार करणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे (१८-०४-२०१८) :** (१) नाही.
(२) होय. या संदर्भात प्राप्त तक्रारीस अनुसरुन सदर प्रकरणाची प्रादेशिक वक्फ अधिकारी, पुणे यांनी चौकशी करुन आपला अहवाल महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाला सादर केला आहे.

(३) सदर प्रकरणी सविस्तर चौकशी करुन वक्फ अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक ती कार्यवाही तातडीने करण्याच्या सूचना महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाला देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे चुळणे व मौजे माणिकपूर क्षेत्रातील पाण्याच्या टाकीकरीता आरक्षित जागेवर अतिक्रमण झाल्याबाबत

**(१६) ३६९८८ (०४-०१-२०१८). श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे चुळणे स.नं. १९७ ब मधील (ता.वसई, जि.पालघर) तसेच मौजे माणिकपूर स.नं. ६९ या क्षेत्रातील जागा पाण्याच्या टाकीसाठी (इएसआर) आरक्षित आहे, हे खरे आहे काय.
(२) असल्यास, पाण्याच्या टाकीसाठी आरक्षित असलेल्या जागेमध्ये मे.युनिक लॅन्ड रियालिटी प्रा.लि. मुंबई या कंपनी मालकांने अतिक्रमण केले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्‌नुसार सदर अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०४-०४-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) मानवधिकार फाउन्डेशनचे श्री.सुरेंद्र सिंह यांनी मौजे चुळणे स.नं. १९७, हि. नं. ब व मौजे माणिकपूर येथील स.नं. ६९, हि. नं. १२ या मिळकतीमधील बांधकामाबाबत सप्टेंबर, २०१७ मध्ये वसई-विरार शहर महानगरपालिकेकडे तक्रार केली होती. वसई-विरार शहर महानगरपालिकेने सदर प्रकरणी चौकशी केली असता पाण्याच्या टाकीसाठी आरक्षित असलेल्या जागेमध्ये अतिक्रमण झाल्याचे चौकशी दरम्यान निष्पन्न झाले नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील अन्न व कृषी प्रक्रिया उद्योगासाठी नाबार्डतर्गत विशेष निधी उभारण्याबाबत

**(१७) ३७०९१ (०३-०१-२०१८). श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अन्न व कृषी प्रक्रिया उद्योगासाठी नाबार्ड अंतर्गत रूपये २००० कोटींचा विशेष निधी उभारला जात असल्याने शेतकऱ्यांना या कृषी उद्योगाचा मोठा लाभ होणार असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील (२८-०२-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे. याबाबत सर्व भागधारकांची नाबार्डच्या पुणे येथील प्रादेशिक कार्यालयात दिनांक १७/०५/२०१७ रोजी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

(२) व (३) सदरची बाब केंद्र शासनाच्या अखत्यारीतील असल्यामुळे प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सर्वच आरटीओ कार्यालयामध्ये पासिंग करण्याच्या प्रक्रियेत शिथिलता आणण्याबाबत

**(१८) ३७१८४ (०३-०१-२०१८). आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्वच आरटीओ कार्यालयामध्ये वाहन निरिक्षक दिवसाला २० किंवा २५ वाहनांचेच पासिंग करत असल्यामुळे वारंवार पासिंग करणाऱ्यांसाठी वाहनचालकांच्या मोठ्या रांगा/नंबर लावूनही पासिंग होत नसल्याने वाहनचालकांचा वेळ वाया जात असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, न्यायालयीन आदेशाप्रमाणे २० मीटरचा ट्रॅक उपलब्ध नसले तरी सार्वजनिक रस्त्यावर वाहनांचे ब्रेक आणि हेड लाईटची चाचणी होत असल्याने न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करताना सर्वसामान्य वाहनचालकांना त्रास होत असल्याने न्यायालयाने निर्णयात शिथिलता आणण्याबाबत शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते (०७-०५-२०१८) :** (१) व (२) जनहित याचिका क्र. २८/२०१३ मध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिलेले आदेश आणि केंद्रीय मोटार वाहन नियम ६२ नुसार वाहनांची योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणासाठी तपासणी होणे आवश्यक आहे. तसेच या तपासणीचे व्हिडीओ शुटींगही करणे आवश्यक आहे. त्यामुळे वाहन चालकांना त्रास होवू नये आणि वेळ वाया जावू नये म्हणून पूर्वनिश्चित पध्दती (Appointment System) चालू केली असून वाहन मालकास योग्यता प्रमाणपत्र संपण्याचा ३० दिवस अगोदर पूर्वनिश्चित वेळ घेता येवू शकते. त्याचप्रमाणे सर्व ५० कार्यालयामध्ये व्हिडीओ शुटींगची व्यवस्थाही करण्यात आली आहे. सद्य:स्थितीमध्ये राज्यातील ३५ परिवहन कार्यालयामध्ये ब्रेक टेस्ट ट्रॅक कार्यान्वित झालेले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने अनधिकृतपणे गोठ्याचे बांधकाम केल्याबाबत

**(१९) ३७२६० (०४-०१-२०१८). ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (प) विभागातील गोविंदवाडी बायपास रस्त्याच्या कामामुळे बाधित होणाऱ्या गोठ्यांची तात्पुरती सोय करण्यासाठी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने तात्पुरत्या शेडचे बांधकाम केल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तात्पुरत्या गोठ्यांच्या शेड बांधकामास रुपये ३९.६३ लक्ष इतका खर्च आला असून सदरहू खर्चाकरीता निविदा प्रक्रिया अवलंबिण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बांधकामासाठी कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या नगररचना विभागाची तसेच उक्त जागा ही सीआरझेड क्षेत्रामध्ये येत असल्यामुळे मेरीटाईम बोर्डाची मंजूरी घेण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच उपरोक्त जागा सीआरझेड क्षेत्रात येत असून त्याकरीता नगररचना तसेच मेरीटाईम बोर्डाची परवानगी न घेता अनधिकृतपणे गोठ्यांच्या केलेल्या बांधकामाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार यास जबाबदार असणाऱ्या दोषी व्यक्तींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२०-०४-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) तात्पुरत्या स्वरुपात बांधलेल्या गोठ्याच्या शेडच्या बांधकामास रुपये ३९.५० लक्ष खर्च झालेला आहे. विकास नियंत्रण नियमावली २४(३) नुसार तात्पुरत्या स्वरूपाचे शेडसाठी परवानगी देण्यात आली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडील जिल्हा दरसूची सन २०१५-१६ नुसार प्राकलन तयार करून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) क मधील तरतूदीनुसार निविदा न मागविता गोठ्याचे तात्पुरत्या स्वरूपातील बांधकाम केलेले आहे.

(३) व (४) रस्ता विकसनासाठी घेतलेली जागा तसेच तात्पुरत्या स्वरूपात उभारलेल्या गोठ्याची जागा या दोन्ही सी.आर. झेड-२ ने बाधित होत आहे.

उपरोक्त नमूद केलेनुसार सदरहू शेड जनावरांच्या तात्पुरत्या सोयीकरीता उभारण्यात आलेली असून, सदरहू शेडचे बांधकाम हे विद्यमान सार्वजनिक वापरात नसलेल्या रस्त्याने बाधित जागेमध्ये बांधलेली आहे.

सबब सदरहू जागा ही सार्वजनिक रस्त्याची असल्याने, तसेच मेरी टाईम बोर्डाच्या अखत्यारीत नसल्याने त्यास मेरी टाईम बोर्डाची परवानगी घेण्यात आलेली नाही, असे महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील प्राध्यापकांच्या वेतनाबाबत

**(२०) ३७४९४ (०२-०१-२०१८). श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राध्यापकांनी दिनांक ४ फेब्रुवारी, २०१३ ते १० मे, २०१३ या कालावधीतील सर्व प्रकारच्या परीक्षेच्या कामकाजावर बहिष्कार घातला असून सदर बहिष्कार विरोधात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर याचिकेवर सुनावणी होऊन एमफुक्टो संघटनेबरोबर चर्चा करण्यासाठी उच्चस्तरीय समिती नेमून सर्व प्रकारचे प्रश्न ७१ दिवसाच्या वेतनासह सोडवावेत असा निकाल दिला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्राध्यापकांना सदर कालावधीतील वेतन देण्याबाबत मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १० मार्च, २०१६ रोजी समिती स्थापन करून निर्णय घेण्याचे मान्य करण्यात आले असून सदर प्राध्यापकांना बहिष्कार कालावधीतील वेतन मिळण्याबाबत विविध संघटना व लोकप्रतिनिधी यांच्याकडून मागणी करण्यात येत आहे काय तसेच सदर समितीच्या एमफुक्टो संघटनेबरोबर किती बैठका झाल्या आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन परीक्षा बहिष्कार कालावधीतील ७१ दिवसाचे वेतन किती दिवसात अदा करण्यात येईल याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे (०७-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र. १३२६/२०१२ मध्ये दिनांक १० मे, २०१३ रोजी शिक्षक व शिक्षक संघटनांच्या मागण्यांच्या अनुषंगाने शासनस्तरावर तक्रार निवारण समिती असणे आवश्यक आहे. राज्यस्तरावर अशा प्रकारची तक्रार निवारण समिती गठीत करण्यात यावी व समितीच्या माध्यमातून शिक्षक व शिक्षक संघटनेच्या मागण्या/समस्या/तक्रारी इ. सखोल विचार करून त्यावर निर्णय घ्यावा असे आदेश दिले.
(३) व (४) याचिका क्र. १३२६/२०१२ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक १० मे, २०१३ रोजी दिलेल्या आदेशास अनुसरून दिनांक २५ जुलै, २०१३ च्या शासन निर्णयान्वये शासनस्तरावर राज्यस्तरीय तक्रार निवारण समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीची बैठक दिनांक २५ सप्टेंबर, २०१३ व दिनांक ०९ जानेवारी, २०१४ रोजी आयोजित करण्यात आली होती. तथापि, एमफुक्टो संघटनेस सदर समितीची रचना मान्य नसल्याच्या कारणास्तव संघटनेचे कोणीही प्रतिनिधी बैठकीस उपस्थित राहीले नाहीत. तद्नंतर दिनांक १० मार्च, २०१६ च्या शासन निर्णयान्वये उक्त समितीची पुनर्रचना करून विशेष समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीची बैठक दिनांक २७/०२/२०१७ रोजी आयोजित करण्यात येऊन त्यामध्ये शिक्षक संघटनांना आमंत्रित करण्यात आले होते. तथापि, अपरिहार्य कारणास्तव सदरची बैठक होऊ शकली नाही. दिनांक १० मार्च, २०१६ च्या शासन निर्णयानुसार गठीत विशेष समितीची बैठक घेण्याची कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे कोहळ (ता.नेर, जि.यवतमाळ) येथे भुसंपादनाच्या लाभापासून लाभार्थ्यांना वगळल्याबाबत

**(२१) ३७५३७ (०३-०१-२०१८). श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कोहळ (ता.नेर, जि.यवतमाळ) येथील नागरिकांना भुसंपादन क्र. २७/४७/२००६-०७ या मधून जातीच्या कारणावरुन पुनर्वसनाच्या लाभापासून लाभार्थ्यांना वगळले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत अर्जदाराने शासनाकडे लेखी तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भूसंपादन अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील (१९-०३-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) होय.

(३) भुसंपादन मामला क्र. १३/४७/२०००-०१ व २७/४७/२००६-०७ मौजे कोहळ प्रकरणातील संयुक्त मोजणीमध्ये तक्रारकर्त्याचे घर क्र. १६४/२ चा समावेश नसल्याने निवाड्यात मोबदला मिळाला नाही.तसेच सदर घर क्र. १६४/२ मुळ संयुक्त मोजणी व सुधारीत संयुक्त मोजणी नंतरचे असल्याने मोबदला देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. घर क्र. १६४/२ बाबत मालकीहक्क दर्शविणारे पुरावे श्री.भगवंत रेवनाथ गुजर यांच्याकडे उपलब्ध नाहीत. त्यामुळे जातीच्या कारणावरून भुसंपादन मामला क्र. २७/४७/२००६-०७ मौजे कोहळमधील श्री.भगवंत रेवनाथ गुजर यांना पुनर्वसनाच्या लाभापासुन वंचित ठेवण्यात आले, असे म्हणने संयुक्तीक वाटत नाही. तसेच त्यांना पुनर्वसनाच्या लाभापासून वंचित ठेवण्याची चुक झालेली नाही. त्यामुळे दोषीवर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सुंदरखेड व भादोला येथील पाणीपुरवठा योजनेची निविदा रद्द करण्याबाबत

**(२२) ३७५७८ (०२-०१-२०१८). श्री.विनायकराव मेटे** : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बुलढाणाव्दारा आचारसंहिते दरम्यान सुंदरखेड व भादोला येथील पाणीपुरवठा योजनेची निविदा प्रसिध्द करण्यात आल्याने आचारसंहितेचे उल्लंघन झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बुलढाणाव्दारा सुंदरखेड व भादोला येथील पाणीपुरवठा योजनेची निविदा आचारसंहिता दरम्यान प्रसिध्द करण्यासाठी निवडणुक आयोगाची परवानगी घेण्यात आली होती काय,

(३) असल्यास, आचारसंहिता कालावधीत सुंदरखेड व भादोला येथील पाणीपुरवठा योजनेची निविदा रद्द करण्याचा प्रस्ताव सादर करण्याबाबत लेखी स्वरुपात निवडणुक विभागाला महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने कळविले होते काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सुंदरखेड व भादोला येथील पाणीपुरवठा योजनेच्या निविदा प्रसिध्द करण्याबाबत कार्यवाही करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर (०३-०३-२०१८)** : (१) ते (३) या प्रकरणी आचारसंहिता भंग झालेली आहे किंवा कसे तसेच सदर योजनांची थांबविण्यात आलेली पुढील कार्यवाही पुढे चालू करावी किवा कसे याबाबत अधिक्षक अभियंता (मु.), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी मा.आयुक्त, राज्य निवडणूक आयोग यांचेकडून दिनांक ०९ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या पत्रान्वये मार्गदर्शन / आदेश मागितले आहेत. याबाबतचे मार्गदर्शन/ आदेश राज्य निवडणूक आयोग यांचेकडून अद्यापपर्यंत प्राप्त झालेले नाही.

(४) याबाबत राज्य निवडणूक आयोग यांचेकडून मार्गदर्शन/ आदेश प्राप्त झाल्यानंतर उचित कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विजाभज आश्रम शाळेत कार्यरत असणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची नवीन पेन्शन योजनेतील व्याजाची रक्कम अदा करणेबाबत**

**(२३) ३७५८४ (२९-११-२०१७). श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजी नवीन अंशदान पेन्शन योजना लागू करण्यात आली असून सदर योजनेमध्ये कर्मचाऱ्यांची एक हप्ता कपात करून तेवढीच रक्कम शासनाकडून टाकण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास मार्च, २०१७ च्या अधिवेशनामध्ये खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील कर्मचाऱ्यांच्या नवीन पेन्शन योजनेवरील व्याजाची तरतूद राज्य शासनाकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विजाभज विभागात कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या व्याजाची रक्कम जमा करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषंगाने विजाभज शाळेतील कर्मचाऱ्यांचे नवीन पेन्शन योजनेचे व्याज संबंधित कर्मचाऱ्याच्या खात्यामध्ये वर्ग करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**प्रा. राम शिंदे (१५-०५-२०१८) :** (१) राज्यात सदरहू योजना दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ पासून लागू करण्यात आली आहे. तथापि, कर्मचाऱ्यांच्या हप्त्याच्या हिश्श्या एवढी रक्कम शासनाकडून जमा केली गेली नाही.

(२) व (३) नाही. प्रस्ताव शासनाच्या विचारधीन आहे.

(४) काही ठिकाणी कर्मचाऱ्यांचे अंशदान जमा केले जाते व काही ठिकाणी जमा केले जात नसल्याचे आढळून आले आहे. तथापि, राज्य शासनाच्या हिश्श्याची व त्यावरील व्याजाचे प्रदान करण्यासाठी नवीन लेखाशिर्ष उघडण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

---

## राज्यात अभियोग्यता चाचणी मधील संधी व वयाची अट रद्द करण्याबाबत

**(२४) ३७६०८ (०२-०१-२०१८). श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक २ मे, २०१२ नंतर शिक्षक भरतीला बंदी घालण्यात आली असून सदर भरतीवरील बंदी काढण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात दिनांक २३ जून, २०१७ च्या शासन आदेशाने सदर भरती ही अभियोग्यता चाचणीद्वारे करण्यात येणार असून सदर परीक्षा देण्यासाठी वयाची कमाल मर्यादा ३७ वर्षे व ५ संधी देण्यात आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अटीमुळे शिक्षक भरती बंदी काळात मान्यता न दिल्यामुळे शिक्षकांचे वय ३७ पेक्षा जास्त झाले असून ही वयाची अट असल्याने अनेक मान्यते अभावी प्रलंबित असलेल्या शिक्षकांना अभियोग्यता चाचणी देता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अभियोग्यता चाचणीमध्ये देण्यात येणारी संधी व वयाची अट रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे (०४-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर परीक्षेकरीता उमेदवाराची वयोमर्यादा किमान १८ ते ३८ वर्षे खुल्या प्रवर्गाकरीता असून मागासवर्गीयांकरीता कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे अशी आहे.

(३), (४) व (५) आरक्षणातंर्गत असलेली पदे तसेच गणित, विज्ञान, भाषा या विषयातील पदे नियमानुसार भरण्याची कार्यवाही सुरु होती. सेवा भरतीसाठी प्रचलित नियमानुसार वयोमर्यादेची अट लागू होते. त्यामुळे वयोमर्यादा शिथील करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांची परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्याबाबत

**(२५) ३७६१० (०४-०१-२०१८). श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांची परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्याचा निर्णय शासनाने घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जेथे संस्था तेथेच परीक्षा केंद्र राहणार आहे काय, तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्था असलेल्या सर्व ठिकाणी अखंडित वीज पुरवठा व ऑनलाईनची व्यवस्था असल्याबाबत शासनाने खात्री करून घेतली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वस्तुस्थिती दर्शक अहवाल पटलावर ठेवण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, मुंबई विद्यापीठाच्या ऑनलाईन मूल्यमापनाची फजिती ज्ञात असताना, ग्रामीण भागातील गरीब विद्यार्थ्यांच्या परीक्षेबाबत ऑनलाईन पद्धतीने परीक्षा घेण्याच्या निर्णयाचा शासन पुनर्विचार करणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (२८-०२-२०१८) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

अखिल भारतीय व्यवसाय सत्र परीक्षा ऑनलाईन पध्दतीने टप्प्याटप्प्याने राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

(२) होय, अंशत: खरे आहे.

जिल्ह्याच्या ठिकाणी ज्या संस्था कार्यरत आहेत. तेथील प्रशिक्षणार्थ्यांची ३५ व्यवसायांची प्रथम सत्राची परीक्षा जिल्हास्तरावरील परीक्षा केंद्रावर ऑनलाईन पध्दतीने MahaIT यांनी नेमलेल्या एजन्सीमार्फत घेण्यात येईल व तालुका स्तरावरील प्रशिक्षणार्थ्यांची परीक्षा ऑफलाईन पध्दतीने घेण्यात आली आहे. ज्या ठिकाणी ऑनलाईन परीक्षा घेण्यात येणार आहे त्या ठिकाणी अखंडीत वीज पुरवठा व ऑनलाईनची व्यवस्था असल्याबाबत खात्री केली आहे.

(३) होय.
(४) ऑनलाईन परीक्षा पध्दत व ऑनलाईन मुल्यमापन या प्रक्रिया भिन्न असून, ऑनलाईन परीक्षा डीजीटी, नवी दिल्ली यांनी पुरविलेल्या वस्तुनिष्ठ प्रश्नांच्या आधारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहे. जुलै, २०१७ मध्ये प्रायोगिक तत्वावर घेण्यात आलेल्या एका व्यवसायाच्या ऑनलाईन परीक्षेच्या अनुभवावरून, जानेवारी/ फेब्रुवारी, २०१८ मध्ये घेण्यात येणाऱ्या परीक्षापैकी सदर ऑनलाईन परीक्षा फक्त ३५ व्यवसायांच्या, प्रथम सत्राच्या केवळ जिल्ह्यास्तरावरील परीक्षा केंद्रातील प्रशिक्षणार्थ्यांसाठी सर्व सोयी-सुविधा उपलब्ध असलेल्या केंद्रात घेण्यात येणार असून सदर परीक्षा यशस्वीपणे राबविण्याची खात्री करूनच शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे मुंबई विद्यापीठाच्या ऑनलाईन मुल्यमापन पध्दतीसारखी सदर परीक्षेबाबत परिस्थिती उद्‌भवणार नाही याबाबत आवश्यक उपाययोजना व खात्री करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे आगर नांदूर (ता.गेवराई, जि.बीड) येथील वक्फ मालमत्तेवरील अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत

**(२६) ३७६२५ (०३-०१-२०१८). श्री.अमरसिंह पंडित** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे आगर नांदूर (ता.गेवराई, जि.बीड) येथील सर्व्हे क्र.१७ (गट क्र.४०) मधील ३० एकर २५ गुंठे जमीन दर्गा हजरत कोचकशहावली उर्फ शहेनशाहवली दर्गा, बीड यांचे विरासत क्र.८६/इनाम के.व्ही./३५/दिनांक १/१०/१९९० नुसार त्यांच्या मुतावल इनामदार यांना मंजूर करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हैद्राबाद निर्मुलन कायदा १९५४ चे उल्लंघन करूनही जमीन खिदमत माश असतानाही मदतमाश असल्याचे खोटे दस्त तयार करून अधिकाऱ्यांशी संगनमत करून या जमिनीच्या अभिलेख्यावर प्रतिबंधित मालक म्हणून प्रभाकर नगरे या नावाची नोंद घेण्यात आली, हे ही खरे आहे

काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करून दोषी विरोधात कारवाई करण्याची मागणी दिनांक २/१२/२०१७ रोजी तहसिलदार, गेवराई यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी पूर्ण होईपर्यंत शासनाने या जमिनीच्या रास्त उपभोगापासून नगरे यास प्रतिबंधित करणार आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणात दिनांक ३१/८/२०१३ रोजी संबंधित ईनामदार यांनी जिल्हाधिकारी, बीड यांना तक्रार अर्ज प्रकरणाची शासनाने चौकशी करून वक्फ मालमत्तेवरील अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील (२४-०४-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) श्री.प्रभाकर साहेबराव नागरे यांनी दिनांक २९/०२/२००० रोजी उपजिल्हाधिकारी, भूसुधार, बीड यांचेकडे हैद्राबाद इनाम निर्मुलन कायदा-१९५४ चे कलम २ (अ) नुसार सदरील जमीन मदतमाश ठरवून कलम ६ (१) प्रमाणे त्यांना प्रतिबंधित मालक जाहीर करण्यासाठी अर्ज सादर केला होता.उपजिल्हाधिकारी, भूसुधार बीड यांनी या प्रकरणात सुनावणी घेवून दिनांक १७/०५/२००१ च्या आदेशान्वये हैद्राबाद निर्मुलन कायदा-१९५४ चे कलम २ (अ) नुसार सदर जमीन मदतमाश असल्याचे घोषित करुन उक्त कायद्याचे कलम ६ (१) नुसार प्रभाकर साहेबराव नांगरे यांची प्रतिबंधित मालकी मंजूर केलेली आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) सदर प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ट आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

**राहनाळ (ता.भिवंडी, जि.ठाणे) या ग्रामपंचायतीमधील गैरव्यवहाराबाबत**

**(२७) ३७६२६ (०२-०१-२०१८). श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राहनाळ (ता.भिवंडी, जि.ठाणे) ग्रामपंचायतीमध्ये मुल्यांकन आधारित कर आकारणी ही मार्गदर्शक सूचना प्रमाणे न करता कमी दाखवण्यात आली आहे, तसेच गोडाऊनची कर आकारणी कमी दर्शवून व खोट्या मोजमाप आकारणीमुळे ग्रामपंचायतीचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची हद्द निश्चिती झाली असून देखील राहनाळ ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी दुरूस्तीच्या नावे नवीन बांधकामाची परवानगी नियमबाह्यरित्या देत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राहनाळ ग्रामपंचायतीमध्ये उद्यान, रस्ते हे गोडाऊन धारकांकडून पैसे घेवुन करण्यात येतात व त्याची देयके ग्रामपंचायतीमार्फत अदा होतात, तसेच सन २०११-१२ पासून ग्रामपंचायतीने मेडीक्लोअर खरेदी ई-निविदा न मागवता खरेदी करणे व अपंगासाठीचा ३% निधी इतरत्र खर्च करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या ग्रामपंचायतीच्या गैरव्यवहाराबाबत अनेक लेखी तक्रारी होऊनही याबाबत दोषी ग्रामविकास अधिकारी/सरपंच, उपसरपंच व संबंधित पदाधिकारी यांचेवर अद्यापही कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-०३-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रस्तुत प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांनी चौकशी करण्यासाठी गट विकास अधिकारी, पंचायत समिति,

अंबरनाथ यांची चौकशी अधिकारी म्हणून दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजीच्या आदेशान्वये नियुक्ती केली होती. त्याबाबतचा अहवाल दिनांक ०७ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांच्याकडे सादर केला आहे.

त्यानुसार राहनाळ ग्रामपंचायतीमध्ये उद्यान, रस्ते हे गोडाऊन धारकांकडून पैसे घेवुन करण्यात येतात व त्याची देयके ग्रामपंचायतीमार्फत अदा होतात, हे खरे नाही.

राहनाळ ग्रामपंचायतीने सन २०११-१२ ते २०१७-१८ या कालावधीतील प्रत्येक वर्षाच्या मेडीक्लोअर खरेदीची रक्कम रूपये तीन लाखाच्या आत असल्याने दर वर्षी दरपत्रके मागवून मासिक सभेच्या मंजूरीने केली आहे.

मागासवर्गीयांच्या विकासासाठीचा १५ टक्के निधी तरतुदीप्रमाणे खर्च केला नसल्याने मोठ्या प्रमाणात अनुशेष शिल्लक राहिल्याने तसेच अपंग कल्याणासाठीच्या ३ टक्के निधीची अनुशेषासह तरतुद केली नसल्याने या अनियमिततेबाबत संबंधित सरपंच / ग्रामविकास अधिकारी यांना नोटीस देण्यात आली आहे.

---

## सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेनुसार अनुज्ञेय लाभ मिळणेबाबत

**(२८) ३७६२७ (०६-०३-२०१८). श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अल्पबचत संचालनालयांतर्गत विविध जिल्हा कार्यालयातील सेवा निवृत्त झालेल्या अल्पबचत अधिकाऱ्यांनी दिनांक १ ऑक्टोबर, २००६ ते दिनांक ३१ मार्च, २०१० या कालावधीत सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेनुसार अनुज्ञेय आर्थिक फायदे मिळणेसाठी शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांना अनुज्ञेय लाभ देण्याबाबत मा.उच्च न्यायालय यांनी दिनांक २४ जून, २०१६ रोजी आदेश दिला आहे तसेच, अल्पबचत अधिकारी यांनी शासनाचे पत्र दिनांक १५ जून, २०१६ अन्वये आवश्यक ती कागदपत्रे शासनाकडे सादर केली आहेत, हे ही खरे आहे

काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सेवानिवृत्त अधिकारी यांना आश्वासित प्रगती योजनेनुसार अनुज्ञेय लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (२७-०४-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) जिल्हा कार्यालयाचे सहायक संचालक, अल्पबचत यांनी शासनाच्या दिनांक १५/०६/२०१७ च्या पत्रास अनुसरून सेवाभिलेख शासनाकडे सादर केलेले आहेत.
(३) दिनांक ०१/१०/२००६ ते दिनांक ३१/०३/२०१० या कालावधीत अल्पबचत संचालनालयाच्या आस्थापनेवरील सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/ कर्मचारी यांना त्यांचे सेवाभिलेख तपासून दिनांक २६/१०/२०१७ च्या कार्यालयीन आदेशान्वये सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेनुसार अनेुज्ञय दुसरा लाभ मंजूर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्य परीक्षा परिषदेकडून घेण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती अर्जाची आकडेवारी कमी झाल्याबाबत

**(२९) ३७६३० (०५-०४-२०१८). श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य परीक्षा परिषदेकडून घेण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती अर्जाची आकडेवारी दोन वर्षात कमी झाल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार राज्य परीक्षा परिषदेकडून घेण्यात येणाऱ्या अर्जाची संख्या कमी होवू नये यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे (०८-०५-२०१८) :** (१) व (२) होय.

सन २०१७-१८ च्या इ. ५ वी व इ. ८ वी करीता असणाऱ्या शिष्यवृत्तीची माहिती व महत्व शिक्षक, विद्यार्थी व पालकांपर्यंत पोहचण्याकरीता किशोर, जीवन संक्रमण व शिक्षण संक्रमण अशा मासिकातून लेख प्रसिद्ध करण्यात आले आहेत. तसेच क्षेत्रिय अधिकारी यांच्या बैठका, व्हिडिओ कॉन्फरन्स आयोजित करुन मुख्याध्यापकांचे उद्बोधन करणे अशा प्रकारे परीक्षा परिषदेकडून उपक्रम राबवून सदर शिष्यवृत्ती परीक्षेकरीता अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्याचा प्रयत्न केला जातो.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील वक्फ बोर्डाच्या मालमत्तेचे सर्वेक्षण करण्याबाबत**

**(३०) ३७८०२ (०५-०४-२०१८). ॲड.अनिल परब, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे : दिनांक २ ऑगस्ट, २०१७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ७ मधील प्रश्न क्रमांक २८६१५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वक्फ मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वक्फ बोर्डाच्या मालमत्तेचे सर्वेक्षण करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर सर्वेक्षणाचे काम किती कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे व त्यासाठी किती खर्च करण्यात येणार आहे,
(३) तसेच वक्फ बोर्डाच्या मालमत्तेबाबत ए.टी.शेख यांच्या समितीने

शासनास शिफारशी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे (२५-०५-२०१८) :** (१) होय.
(२) सर्वेक्षणाच्या पहिल्या टप्प्यात पुणे आणि परभणी येथे पथदर्शी सर्व्हेक्षण करण्यास सुरुवात करण्यात आलेली असून सदर सर्व्हेक्षणाच्या आधारे संपूर्ण राज्यातील वक्फ मालमत्तांचे सर्व्हेक्षण करण्यात येणार आहे. सदर सर्वेक्षण दोन वर्षात पूर्ण होणे अपेक्षित आहे. पुणे व परभणी येथील पथदर्शी सर्वेक्षणासाठी रुपये १.०८ कोटी तसेच राज्याच्या उर्वरित भागातील सर्वेक्षणासाठी रुपये ४.२७ कोटी खर्च अपेक्षित आहे.
(३) होय.
(४) श्री.ए.टी.ए.के.शेख, चौकशी आयोगाने सादर केलेला चौकशी अहवाल व त्यानुषंगाने शासनाने केलेल्या कार्यवाहीचा कृति अहवाल दिनांक १०/०४/२०१५ रोजी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या पटलावर ठेवण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील सहकारी संस्थाचे बळकटीकरण करण्याबाबत

**(३१) ३७९१४ (०३-०४-२०१८). डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामीण भागातील अवसायानात गेलेल्या सहकारी संस्थाचे बळकटीकरण करण्यासाठी शासनामार्फत अटल महापणन विकास अभियान राबविण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान जाहिर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अभियानांतर्गत राज्यभरातील किती सहकारी संस्थांचे बळकटीकरण करण्यात येणार आहे, यासाठी कोणते उपक्रम राबविण्यात येणार आहेत व त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख (१७-०५-२०१८)** : (१) होय.

(२) सन २०१७-१८ या वर्षात अटल महापणन विकास अभियान राबविण्यासाठी दिनांक २६/१२/२०१७ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. या योजनेंतर्गत ५००० सहकारी संस्थाचे सक्षमीकरण प्रस्तावित आहे. याबाबत सविस्तर माहिती शासन निर्णयात नमूद केली आहे. संस्थाच्या बळकटीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे आहे :-

(अ) गावातील १००% शेतकऱ्यांना विकास सोसायटीचे सभासद करुन घेणे,

(ब) विकास सोसायटीला तालुका खरेदी विक्री संघाचा सभासद करुन घेणे,

(क) पणन महासंघाचे सर्व उपक्रम खरेदी विक्री संघाद्वारे आणि खरेदी विक्री संघाचे सर्व उपक्रम विकास सोसायटीद्वारे राबविणे.

(ड) गोदामाचा पूर्ण वापर व शेतमाल तारण योजना इत्यादि सारख्या शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून खेळते भांडवल उभे करणे व आर्थिक स्थिती सुधारणे,

(ई) शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणाऱ्या कृषी निविष्ठा व कृषी अवजारे इत्यादीचे खरेदी विक्री वाढविणे

फ) कृषी मालाची खरेदी करुन स्वच्छता, प्रतवारी करुन त्याचे पॅकेजींग,लेबलींग व ब्रॅडींग करुन त्याची विक्री करणे, तसेच गरजेप्रमाणे जीवनावश्यक वस्तू खरेदी विक्री वा इतर कोणत्याही तत्सम क्षेत्रात उतरुन संस्थाची आर्थिक उलाढाल वाढविणे,

ग) शेतकरी उत्पादक संस्था व महिला बचत गटाची उत्पादने व सेवांची विक्री सहकारी पणन संस्थाद्वारे शहरी भागातील गृहनिर्माण संस्थाना करुन त्यांना सहकारी व्यवस्थेशी जोडणे,

ह) शासनाच्या विविध योजना उदा. स्वस्त धान्य दुकान, पोषण आहार पुरवठा इ. मध्ये सक्रीय सहभाग घेऊन उत्पन्न वाढविणे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मराठी भाषेचे धोरण निश्चित करण्याबाबत

**(३२) ३७९८१ (०५-०४-२०१८). श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.मोहनराव कदम, आर्कि.अनंत गाडगीळ : दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक ३२८८० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठी भाषेचे धोरण निश्चित करण्यासाठी डॉ. सदानंद मोरे यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या सल्लागार समितीने आपला अहवाल माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान शासनास सादर केला, हे खरे आहे काय,

(२) तसेच, औरंगाबाद येथे मराठी भाषेचे पुढील २५ वर्षाचे धोरण निश्चित करण्यासाठी शासनाने स्थापन केलेल्या भाषा सल्लागार समितीने भाषा विभागाकडे सादर केलेल्या मसुद्यावर पाच महिन्याचा कालावधी होऊनही कोणतीही उपाययोजना केली नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अहवालाचे थोडक्यात स्वरुप काय आहे, तसेच मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्यासाठी कैंद्र शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावाचा कशाप्रकारे पाठपुरावा करण्यात येत आहे व त्याची फलनि:ष्पत्ती काय आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे (०८-०५-२०१८) :** (१) होय.

(२) भाषा सल्लागार समितीने सादर केलेल्या मराठी भाषा धोरणाच्या मसुद्याच्या अनुषंगाने धोरणात्मक निर्णय घेण्याच्यादृष्टीने पुढील कार्यवाही सुरू आहे.

(३) व (४) उपरोक्त भाषा धोरणाच्या मसुद्यामध्ये शिक्षण, उद्योग, न्यायालय, व्यापार व वाणिज्य संस्था इत्यादी विविध क्षेत्रात मराठीचा प्रभावी वापर होण्याच्यादृष्टीने शिफारशी करण्यात आल्या आहेत.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देणे ही केंद्र शासनाच्या अखत्यारीतील बाब आहे. राज्य शासनाकडून याबाबतचा विहीत प्रस्ताव केंद्र शासनास सादर केला असून, या प्रकरणी केंद्र शासनाकडे पाठपुरावा सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## "एक देश एक कर" प्रणाली धोरणानुसार संपूर्ण देशात जीएसटी लागू करण्याबाबत

**(३३) ३९००३ (०४-०४-२०१८). श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.विक्रम काळे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) "एक देश एक कर" प्रणाली धोरणानुसार संपूर्ण देशात जीएसटी लागू करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील करप्रणालीची अंमलबजावणी करण्यात येत असताना माहे सप्टेंबर, नोव्हेंबर व डिसेंबर, २०१७ या तीन महिन्यात अपेक्षेपेक्षा जीएसटी कराची कमी वसुली झाल्याने राज्याला रुपये १ हजार ६४७ कोटीची तूट आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने करप्रणाली भरपाई केंद्र शासनाकडे मिळण्याबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, केंद्र शासनाने राज्य शासनाला दिनांक ३१ डिसेंबर,२०१७ रोजीपर्यंत किती निधी दिला आहे,

(५) असल्यास, निधी मिळण्याबाबत कोणत्या स्तरावर पाठपुरावा करण्यात येत आहे ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (२६-०४-२०१८) :** (१) होय.

(२) जीएसटीमध्ये अंर्तभूत झालेल्या करांतर्गत सन २०१५-१६ मध्ये प्राप्त झालेला महसूल आधारभूत धरुन त्यावर १४ % वृद्धी लक्षात घेऊन जीएसटी अंतर्गत अपेक्षित महसूलाची परीगणना करण्यात आली असून, त्यानुसार माहे सप्टेंबर, नोव्हेंबर व डिसेंबर, २०१७ महिन्यामध्ये अपेक्षापेक्षा जीएसटी कराची वसुली झालेली नाही.

(३) डिसेंबर, २०१७ अखेर केंद्र शासनाकडे रुपये १६७२ कोटी मागणी करण्यात आली आहे.

(४) डिसेंबर, २०१७ अखेर केंद्र शासनाकडून रुपये ८३४ कोटी नुकसान भरपाई प्राप्त झाली आहे.

(५) निधी प्राप्त झाला आहे.

---

**राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना डीसीपीएस कपात केलेल्या देयकांची पोच पावती देण्याबाबत**

**(३४) ३९०७२ (०५-०४-२०१८). प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २००५ नंतर सेवेत लागलेल्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांचे डीसीपीएस अंतर्गत कपात केलेल्या देयकांची पोच पावती शिक्षकांना देण्यात आली नसल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेंतर्गत अद्यापपर्यंत किती निधी जमा करण्यात आला व या जमा केलेल्या निधीची पोच पावती शिक्षकांना कधीपर्यंत देण्यात येणार आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे (०८-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) शासनाच्या दिनांक २८/२/२०१८ च्या निर्णयान्वये शासन हिस्सा व व्याजाची रक्कम वितरीत करण्यात आलेली आहे. सदर निधी जिल्हानिहाय वितरीत केल्यानंतर जमा केलेल्या निधीची शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पोच देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## यवतमाळ जिल्हयातील पुसद वन विभागाच्या ई-निविदेमध्ये पतदारी प्रमाणपत्र टाकून निविदा मॅनेज केल्याबाबत

**(३५) ३९२५३ (०४-०४-२०१८). श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुसद (जि.यवतमाळ) येथील वन विभागाने जिल्हयातील मजूर कामगार सहकारी संस्थेकरीता दिनांक १५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास ई-निविदा प्रकाशित केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ई-निविदेमध्ये अट क्र.३ (जिल्हा मजूर कामगार संघाचे पतदारी प्रमाणपत्र) टाकून निविदा मॅनेज करण्यात आली असून शासन निर्णय दिनांक १९ ऑक्टोबर, २०११ च्या क्र. १० मध्ये स्पष्ट उल्लेख करण्यात आला असतानाही येथील वन विभागाने मात्र यात स्पर्धा होऊ नये याकरीता ही अट टाकली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान नाशिक वन विभाग याच कामाकरीता पतदारी प्रमाणपत्र मागितले नसताना यवतमाळ जिल्हयातील वन विभागाने कोणता नियम लावला व मजूर कामगार सहकारी संस्थाकरीता पतदारी प्रमाणपत्र आवश्यक आहे किंवा कसे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (०७-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर ई-निविदेमधील अट क्र.३ जिल्हा मजूर कामगार सहकारी संस्थेचे पतदारी प्रमाणपत्र ही अट अनावधानाने नमूद करण्यात आली होती. परंतु सदरची बाब लक्षात येताच सदर निविदा रद्द केली व सदरच्या निविदेमध्ये शासन निर्णय दिनांक १९/१०/२०११ अन्वये सुधारणा करुन नव्याने निविदा प्रसिध्द करण्यात आली होती.

(३) शासन निर्णय दिनांक १९/१०/२०११ अन्वये मान्यता प्राप्त नोंदणीकृत मजूर कामगार सहकारी संस्थांना पतदारी प्रमाणपत्र देण्याच्या अटीतून सूट देण्यात आली आहे. मात्र संबंधित जिल्हा उप निबंधक (सहकार) किंवा जिल्हा सहकारी संस्थाकडून सदर निविदेमधील रक्कमेचे काम करण्याची आर्थिक पात्रता आहे असा दाखला मजूर सहकारी संस्थानी सादर करणे आवश्यक आहे, असे नमूद आहे. त्यानुसार सदरची अट ई-निविदा सूचना काढतांना अटी व शर्ती मध्ये अंतर्भुत केली आहे.

(४) चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पनवेल बस आगाराचे अत्याधुनिक बस पोर्ट बनविण्याबाबत**

**(३६) ३९२८७ (०५-०४-२०१८). श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्‌या चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल बस आगाराची दुरुस्ती करुन अत्याधुनिक बस पोर्ट बनविण्याचे काम अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पनवेल आगाराची दुरुस्ती करुन अत्याधुनिक बस पोर्ट बनविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते (११-०५-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) पनवेल येथील बस पोर्टच्या कामासाठी ई-निविदा प्रक्रियेसाठी मे.एडूस पार्क इंटरनेशनल प्रा.लि.,मे. डॉरिक इन्फ्रा प्रा.लि.व मे.प्रतिभा इंडस्ट्रिज प्रा.लि. (संयुक्त) विकासकाची निवड करण्यात आली असून त्यांना पनवेल येथील बस पोर्टच्या कामासाठी महामंडळाशी विकास करार करण्याबाबत दिनांक २८/०३/२०१८ रोजी स्विकारपत्र देण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील विविध विद्यापीठे व मान्यता प्राप्त संलग्न महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतरांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(३७) ३९५३२ (०५-०४-२०१८). डॉ.अपूर्व हिरे, प्रा.अनिल सोले : दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ६ मधील प्रश्न क्रमांक ३१३३८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अकृषी विद्यापीठांशी संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षक-शिक्षकेतर पदांच्या आढाव्यास तसेच दिनांक १ ऑक्टोबर, २०१५ च्या विद्यार्थी संख्येवर आधारीत अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील अनुज्ञेय होणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर पदांच्या आढाव्यास मंजुरी घेण्याची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, वित्त विभागाच्या दिनांक २९ जून, २०१७ च्या शासन निर्णयान्वये अनुदानित संस्थांकडील पदांचा आकृतिबंध निश्चित करण्यासाठी मार्गदर्शक सूचना स्वतंत्रपणे देण्यात येतील, असे स्पष्ट करण्यात आले असून अनुदानित संस्थांकडील पदांचा आकृतिबंध निश्चित करण्यासंबंधीच्या मार्गदर्शक सूचना शासनास प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रिक्त पदांमुळे महाविद्यालयांचे दैनंदिन शैक्षणिक व कार्यालयीन कामकाजावर होत असलेला प्रतिकुल परिणाम व प्रभावित होणारी शैक्षणिक गुणवत्ता, याबाबी विचारात घेता विविध विद्यापीठे व मान्यता प्राप्त संलग्न वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत तसेच शासन अनुमती प्रदान करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच कार्यवाही केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री.विनोद तावडे (०७-०५-२०१८) :** (१) नाही.
(२) नाही.
(३) अधिव्याख्यात्यांच्या रिक्त पदांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शैक्षणिक काम पूर्ण करण्यासाठी तासिका तत्वावरील अभ्यागत अधिव्याख्याता नियुक्तीची तरतुद आहे. त्यानुसार तासिका तत्वावर अधिव्याख्याता नियुक्ती करुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याची काळजी घेण्यात येते.

वित्त विभागाच्या प्रचलित धोरणानुसार पदांच्या आढाव्यास / आकृतिबंधास अंतिम मंजूरी मिळण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे. महत्वाची रिक्त पदे भरण्यासंदर्भात वित्त विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

---

**मराठवाड्यात कृषी विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांच्या अंमलबजावणीबाबत**

**(३८) ३९८०८ (०५-०४-२०१८). श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.रामराव वडकुते, श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यात कृषी विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजना व त्यांच्या अंमलबजावणी व झालेल्या खर्चाचा आढावा राज्याचे कृषी आयुक्तांनी दिनांक ६ जानेवारी, २०१८ रोजी मराठवाड्यातील सर्व जिल्हा तालुकास्तरावरील संबंधित अधिकाऱ्यांच्या बैठकीत घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आढावा बैठकीमध्ये प्रामुख्याने कोणकोणत्या विषयावर चर्चा करण्यात आली आहे, कृषी विकासाच्यादृष्टीने प्रामुख्याने कोणकोणत्या उणीवा विविध योजनांच्या अंमलबजावणीत असल्याचे कृषी आयुक्तांच्या निदर्शनास आल्या आहेत व सदर उणीवा दूर करण्याच्यादृष्टीने शासनाने काय उपाययोजना केल्या आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील (१७-०५-२०१८) :** (१) होय.

(२) सदर आढावा बैठकीमध्ये केंद्र पुरस्कृत योजनांचा मार्च, २०१८ अखेर जिल्हानिहाय व बाबनिहाय होणार अपेक्षित खर्च कापूस बोंड अळी संदर्भात form G, H व I बाबत तसेच, गावनिहाय, शेतकरी निहाय रब्बी/उन्हाळी कांदा पीक गणना इत्यादी विषयांवर प्रामुख्याने चर्चा करण्यात आली. त्यामध्ये केंद्र शासन व राज्य शासनाकडून विविध योजनांचा निधी प्राप्त होत असून प्राप्त निधीच्या तुलनेत खर्च कमी प्रमाणात असल्याचे निदर्शनास आले.

योजनांचे निर्धारीत लक्षांक साध्य करण्यासाठी कार्यान्वयन यंत्रणा प्रमुख म्हणून योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने क्षेत्रिय यंत्रणेला मार्गदर्शनपर सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ग्रामीण भागाच्या पाणीपुरवठा योजनांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३९) ३९८५७ (०५-०४-२०१८). डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामीण भागाच्या पाणीपुरवठा योजनांसाठी शासनाने ७०० कोटी रुपयांचा निधी देण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ७०० कोटी रुपयांच्या निधीपैकी केवळ २१० कोटी रुपयांचा निधी प्रत्यक्षात देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निधी कमी मिळण्याची कारणे काय आहेत व उर्वरित निधी केव्हापर्यंत प्राप्त होणार आहे ?

**श्री.बबनराव लोणीकर (०५-०५-२०१८) :** (१), (२) व (३) राज्यातील ग्रामीण भागातील पाणीपुरवठा योजनांसाठी सन २०१७-१८ मध्ये विभागाच्या अर्थसंकल्पात राज्यस्तरावर एकूण रुपये ५९५ कोटी इतकी तरतूद करण्यात आली असून, दिनांक ३१ मार्च, २०१८ पर्यंत रुपये ५०२ कोटी इतका निधी अंमलबजावणी यंत्रणांना वितरित करण्यात आला आहे.

---

## राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीमधील कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत

**(४०) ४०१७९ (०३-०४-२०१८). श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीमधील कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेणेबाबत अभ्यास करण्यासाठी शासनामार्फत समिती नेमण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, समितीने शासनास अहवाल सादर केला आहे काय, त्यात समितीने काय शिफारशी केल्या आहेत तसेच त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख (२७-०४-२०१८)** : (१) होय.

(२) अभ्यास समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून त्यामध्ये खालीलप्रमाणे पर्याय सुचविण्यात आले आहेत.

१. राज्यातील बाजार समित्यांचे सर्व संवर्गातील १०० टक्के कर्मचारी शासनाच्या सेवेत सामावून घ्यावेत व त्यांचे वेतन, भत्ते इ. शासनाकडून भागविण्यात यावेत. तसेच या बाजार समित्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी संचालक मंडळाची नियुक्ती शासनाने करावी.

२. राज्यातील बाजार समित्यांचे सर्व संवर्गातील १०० टक्के कर्मचारी शासनाच्या सेवेत सामावून घेतल्यास शासनावर पडणारा १०० टक्के वेतन, भत्ते खर्चाचा आर्थिक बोजा सहन करणे शासनास शक्य नसल्यास राज्यशासन व बाजार समिती यांच्यात आर्थिक बोजा स्विकारण्याचे सुत्र निवडण्याचे पर्याय दिले आहेत. याकरीता सन २०१७-१८ चे मंजूर अर्थसंकल्पानुसार बाजार समित्यांच्या कर्मचाऱ्यांवरील आस्थापना खर्चाचा बोजा रुपये ३११.१३ कोटी गृहीत धरण्यात आला आहे.

३. राज्यातील बाजार समित्यांचे अधिकारी, कर्मचारी व कनिष्ठ कर्मचारी या तीन संवर्गापैकी फक्त अधिकारी या संवर्गातील कर्मचाऱ्यांना शासनाच्या सेवेत सामावून घेवून त्यांचे वेतन, भत्ते इ. करीता होणारा खर्च शासनाकडून भागविण्यात यावा. तथापि उर्वरीत कर्मचाऱ्यांचे नेमणूक, वेतन, भत्ते इ. व संचालक मंडळाची निवड ही व्यवस्था सद्याच्या प्रचलीत पध्दतीने राहील.

४. राज्यातील बाजार समित्यांच्या कर्मचाऱ्यांच्या आस्थापना विषयक सर्व बाबींचे कामकाज पाहण्यासाठी महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ किंवा राज्यस्तरीय स्वतंत्र यंत्रणा निर्माण करावी व त्या यंत्रणेमार्फत बाजार समित्यांच्या कर्मचाऱ्यांचे सेवानियम निश्चित करुन नेमणूक, वेतन, भत्ते इ. करीता होणारा खर्च सदरची संस्था / यंत्रणेकडून भागविण्यात यावा. त्याकरीता खर्चासाठी आवश्यक तो निधी राज्यातील बाजार समित्यांनी सदर संघाकडे किंवा यंत्रणेकडे

जमा करावा.

वरील सर्व पर्यायाबाबत तपासणी करुन सुधारीत प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना निर्देश दिले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वन, वनीकरण व महामंडळामधील रोजंदारी तथा कायम वन मजुरांच्या मागण्यांबाबत**

**(४१) ४०२३६ (०४-०४-२०१८). श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वन, वनीकरण व महामंडळामधील रोजंदारी तथा कायम वन मजुरांच्या मागण्यांचे निवेदन महाराष्ट्र राज्य रोजंदारी वन कामगार कृती समितीने माहे नोव्हेंबर,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य रोजंदारी वन कामगार कृती समितीच्या निवेदनाच्या अनुषंगाने मागण्यांसंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (०७-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) महाराष्ट्र राज्य रोजंदारी वन कामगार कृती समितीच्या पदाधिकाऱ्यासोबत स्थानिक अधिकाऱ्यांनी त्यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने चर्चा केली, त्यामुळे त्यांचे समाधान झाले आहे. त्यामुळे कृती समितीने दिनांक ०७/१२/२०१७ चा धरणे, निदर्शने व उपोषण मागे घेतले.

---

## राज्यातील अनुदानित आश्रमशाळांमध्ये कार्यरत शिक्षक कर्मचाऱ्यांसाठी शाळा संहितेचे सुधारित प्रारुप मंजूर करणेबाबत

**(४२) ४०३०५ (०४-०४-२०१८). डॉ.अपूर्व हिरे, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले : तारांकित प्रश्न क्रमांक ३५०५८ ला दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानित आश्रमशाळांमध्ये कार्यरत शिक्षक कर्मचाऱ्यांसाठी आश्रमशाळा संहितेचे सुधारित प्रारुप मंजुर करणेसंबंधीच्या प्रस्तावावरील अंतिम टप्प्यात असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या अनुदानित आश्रमशाळांमध्ये कार्यरत शिक्षक कर्मचाऱ्यांसाठी सुधारित आश्रमशाळा संहिता मंजुर करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तुत सुधारित शाळा संहिता लागू करण्यासंबंधी कोणता निर्णय घेण्यात आला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, अनुदानित आश्रमशाळांमध्ये कार्यरत शिक्षक कर्मचाऱ्यांसाठी आश्रमशाळा संहितेचे सुधारित प्रारुप मंजुर करणेसंबंधीच्या प्रस्तावावरील अंतिम टप्प्यात असलेली कार्यवाही केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**प्रा. राम शिंदे (०५-०५-२०१८) :** (१), (२), (३) व (४) या विभागाचा शासन निर्णय दिनांक १५/०१ /२०१८ अन्वये विभागाने राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, विद्यानिकेतन व ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींच्या शाळांकरीता आश्रमशाळासंहिता लागू केली आहे.

---

## अनुसूचित जाती/जमाती कल्याणकारी योजनेचा निधी कर्जमाफीसाठी वळविण्यात आल्याबाबत

**(४३) ४०४६४ (०४-०४-२०१८). श्री.संजय दत्त :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत सन २०१७-१८ या वर्षातील मंजूर झालेला ५०० कोटी रुपयांचा निधी वितरीत न केल्यामुळे, खर्च न झालेला निधी वित्त विभागाच्या दिनांक १६ ऑक्टोबर, २०१७ च्या शासन निर्णयानुसार सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाकडून काढण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुसूचित जाती/जमातीच्या कल्याणकारी योजना राबविण्यासाठीचा निधी कर्जमाफीसाठी वळविण्यात आल्याने कल्याणकारी योजना राबविता आल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागासवर्गीयांचा किती निधी वळविण्यात आला आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने निधीअभावी मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांवर परिणाम होऊ नये म्हणून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (०८-०५-२०१८) :** (१) नाही.

दिनांक १६/१०/२०१७ रोजीचा शासन निर्णय हा सहकार पणन व वस्त्रोद्योग विभागाचा असून सदर शासन निर्णयान्वये छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना - २०१७ करीता सन २०१७-१८ या वर्षात अनुसूचीत जाती उपयोजनेंतर्गत रुपये ५००.०० कोटी इतका निधी सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागामार्फत वितरीत करण्यात आला आहे.

(२), (३), (४) व (५) राज्य शासनाद्वारे अर्थसंकल्पीत करण्यात येणारी कार्यक्रमांतर्गत तरतूद सर्वसाधारण कार्यक्रम, अनुसूचित जाती घटक कार्यक्रम व अनुसूचित जमाती घटक कार्यक्रम यामध्ये विभाजित करण्यात येते. अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांतर्गतचा निधी विविध विभागाखाली

अर्थसंकल्पीत करण्यात येतो. मात्र अनुसूचित जमाती घटक कार्यक्रमांतर्गतचा निधी आदिवासी विकास विभागांतर्गतच अर्थसंकल्पीत करण्यात येतो. त्यामुळे अनुसूचित जातीतील शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या लाभाची तरतूद सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाखाली करण्यात आलेली असून अनुसूचित जाती घटक कार्यक्रमामधील निधी या योजनेसाठी वळविण्याचा प्रश्न उद्धभवत नाही. अनुसूचित जमातीतील शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या लाभाची तरतूद आदिवासी विकास विभागांतर्गत करण्यात आलेली आहे. राज्य शासनाने अनुसूचित जमाती खालील निधी उपरोक्त योजनेकरीता उपलब्ध करुन देण्यासाठी विहीत मार्गाचा अवलंब करुन निधी अर्थसंकल्पीत केलेला आहे. निधी वळविण्यासाठी पुनर्विनियोजनाचे आदेश निर्गमित करावे लागतात. या प्रकरणी असे कोणतेही आदेश शासनाने काढलेले नसल्याने मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांचा निधी वळविण्याचा प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**शैक्षणिक वर्षापासून राज्यात नवीन महाविद्यालये सुरु करण्याबाबत**

**(४४) ४०५१९ (०५-०४-२०१८). श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येत्या शैक्षणिक वर्षापासून राज्यात नवीन ६२ महाविद्यालये सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यासाठी काय निकष निश्चित करण्यात आले आहेत, तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागाने महाविद्यालये सुरु करण्याबाबतचा बृहत आराखडा सर्व विद्यापिठाकडून मागविला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार कोणकोणत्या विद्यापिठाकडून असा बृहतआराखडा शासनाला प्राप्त झाला आहे, त्याचा तपशील काय आहे ?

**श्री.विनोद तावडे (११-०५-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) शासन निर्णय दिनांक १५/०९/२०१७ अन्वये निकष विहीत करण्यात आले असून सर्व अकृषी विद्यापीठाकडून बृहतआराखडा मागविण्यात आला होता.
(३) सर्व अकृषी विद्यापीठाकडून प्राप्त बृहतआराखडा तपासण्यात आला असून त्यास माहेडने दिलेल्या मान्यतेनुसार संबंधित अकृषी विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करुन यासंदर्भात प्रचलित निकषाप्रमाणे व अधिनियमातील तरतूदीनुसार दिनांक २८/०२/२०१८ अन्वये नवीन महाविद्यालयांना इरादापत्र देण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

---

## सामान्य प्रशासन विभागाच्या अधिसूचनेनुसार चक्राकार पध्दतीने देण्यात येणाऱ्या नियुक्तीबाबत

**(४५) ४०५९० (०४-०४-२०१८). श्री.परिणय फुके :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सामान्य प्रशासन विभागांच्या दिनांक २८ एप्रिल, २०१५ रोजीच्या अधिसूचनेमध्ये नमूद केलेल्या चक्राकार पध्दतीने देण्यात येणाऱ्या नियुक्तीच्या निदेशांचे व दिनांक १६ जुलै, २०१५ रोजीच्या अधिसूचनेमध्ये नमूद निदेशांचे उल्लंघन करून उप संचालक, सामाजिक वनीकरण, वर्धा यांची नागपूर महसूल विभागातून, विभागीय वन अधिकारी, गट-अ (वरिष्ठ श्रेणी) संवर्गातील अधिकारी पदान्वये कोकण महसूल विभागातील विभागीय वन अधिकारी (दक्षता), ठाणे येथे प्रतिनियुक्तीने पदस्थापना देण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गट-अ व गट-ब पदावर पदोन्नती देण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या अधिसूचीमध्ये नमूद केल्याप्रमाणे नागपूर, अमरावती, औरंगाबाद व नाशिक या चक्राकार पध्दतीने महसूली विभाग वाटप करणे गरजेचे असतांना नागपूर महसूल विभागात संतोष दत्तात्रय सस्ते, उपसंचालक, सामाजिक वनीकरण, वर्धा या पदावर असताना त्यांना कोकण

महसूल विभागात प्रतिनियुक्ती पदस्थापना देण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, प्रतिनियुक्तीने कोकण विभागात पदस्थापना केल्यामुळे नागपूर महसूल विभागातील अधिकाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण वाढत असून नागपूर महसूल विभागातील नागरिकांची कामे विहित मुदतीत व वेळेत पूर्ण होत नसल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उपसंचालक, सामाजिक वनीकरण, वर्धा यांची नागपूर महसूली विभागात पदस्थापना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (०५-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) शासन आदेश दिनांक ६ एप्रिल, २०१६ अन्वये, चक्राकार पध्दतीने श्री.संतोष दत्तात्रय सस्ते यांना नागपूर महसूली संवर्ग वाटप होऊन, उपसंचालक, सामाजिक वनीकरण, वर्धा या पदावर पदोन्नतीने पदस्थापना करण्यात आली. त्यानुषंगाने श्री.सस्ते सदरहू पदावर दिनांक १२/०४/२०१६ रोजी रुजू झाले.

तथापि, श्री.सस्ते यांनी त्यांचे कौटुंबिक कारणास्तव कोकण महसूली विभागात पदस्थापनेची विनंती केली असल्याने त्यांचा संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली येथे केलेल्या कामाचा अनुभव विचारात घेऊन, प्रशासकीय हिताच्या दृष्टीकोनातून व त्यांनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने विशेष बाब म्हणून शासन आदेश दिनांक २६ एप्रिल, २०१६ अन्वये त्यांची कोकण विभागातील विभागीय वन अधिकारी (दक्षता) ठाणे या पदावर प्रतिनियुक्तीने पदस्थापना देण्यात आली. त्यांचा मुळ महसूली विभाग नागपूर हाच असून पुढील पदस्थापना नागपूर विभागात होईल.
(३) व (४) हे खरे नाही. डिसेंबर, २०१७ वा त्यादरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरीक यांच्या तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

श्री.सस्ते यांना दिनांक ०५/०५/२०१६ रोजी कार्यमुक्त करण्यात आले. मात्र सदरचे पद रिक्त न ठेवता वेळोवेळी स्थानिक व्यवस्था करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत श्री.आर.बी.गवई यांची नियमित पदस्थापना करण्यात आली असून ते दिनांक १८/०८/२०१७ पासून आजतागायत कार्यरत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हयातील नवीन रास्त भाव धान्य दुकानांना मान्यता देण्याबाबत**

**(४६) ४०६९३ (०५-०४-२०१८). प्रा.डॉ.तानाजी सावंत :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्हयातील ८५ गावात नवीन रास्त भाव धान्य दुकाने देण्यात येणार असून इच्छुकांना दिनांक १५ जानेवारी ते १४ फेब्रुवारी पर्यंत अर्ज करण्याची मुदत दिलेली असल्याची माहिती माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाकडून त्यांच्या प्रचलीत नियमाप्रमाणे बचत गट, मागास, इतर मागास गट किंवा सुशिक्षित बेरोजगार यांना प्राधान्याने सदर धान्य दुकाने देण्याकरीता गांवनिहाय यादी तयार करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अश्या राखीव गावामध्ये जर कोणीच अर्ज केला नसल्यास त्या गावात इतर पर्यायी व्यवस्था करण्याकरीता शासनाने काही उपाययोजना केली आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सोलापूर जिल्हयातील नवीन रास्त भाव धान्य दुकानांना मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट (१८-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) शासन निर्णय क्रमांक राभादु-१७१६/ प्र.क्र.२३९/ना.पु.३१, दिनांक ६ जुलै, २०१७ अन्वये नवीन रास्तभाव दुकाने व किरकोळ केरासीन परवाने देण्याबाबत प्राधान्यक्रम ठरविण्यात आला आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात येते.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील वृध्द साहित्यकांना मानधन देण्याबाबत**

**(४७) ४०७३९ (०५-०४-२०१८). श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वृध्द साहित्यकांना महिना रुपये दोन हजार प्रमाणे मानधन देण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील ८ ते १० महिन्यांपासून वृध्द साहित्यिक ऑनलाईन पध्दतीमुळे मिळणाऱ्या मानधनापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वृध्द साहित्यकांना मानधन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे (०९-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

शासन निर्णय क्र. वृकमा-२०१३/प्र.क्र.४०/सां.का.४, दिनांक २२ ऑगस्ट, २०१४ अन्वये, वृध्द साहित्यिक कलावंतांना त्यांच्या श्रेणीनुसार प्रतिमाह “अ” श्रेणीकरीता रुपये २,१००/-, “ब” श्रेणीकरीता रुपये १,८००/- व “क” श्रेणीकरीता रुपये १,५००/- इतके मानधन देण्यात येते.
(२) हे खरे नाही.

माहे सप्टेंबर, २०१६ पासून कलावंताच्या बॅक खात्यात ऑनलाईन

पध्दतीने मानधन जमा करण्यात येत आहे. सद्य:स्थितीत फेब्रुवारी, २०१८ पर्यंतचे मानधन ऑनलाईन पध्दतीने कलावंतांच्या खात्यात जमा करण्यात आलेले आहे. काही कलावंताचा बँक खात्याचा तपशील प्राप्त नसल्यामुळे त्यांचे मानधन संबंधितांच्या बँक खाती जमा करणे शक्य झालेले नाही. संबंधित कलावंतांचा बँक खात्याचा तपशील प्राप्त होताच त्यांचे खाती तात्काळ मानधन जमा करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कृषी विभागाच्या विविध योजनांचा जिल्हानिहाय आराखडा तयार करण्याबाबत

**(४८) ४०७९६ (०५-०४-२०१८). श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, ॲड.निरंजन डावखरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.रामराव वडकुते, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी विभागाच्या विविध योजनांसाठी मंजूर असलेला निधी माहे फेब्रुवारी महिन्यापर्यंत खर्च करावा तसेच योजनेत जास्तीत जास्त शेतकऱ्यांना सहभागी करुन घेण्याच्यादृष्टीने प्रयत्न करुन त्यानुसार प्रत्येक जिल्ह्याचा स्वतंत्र असा ५ वर्षाचा आराखडा तयार करण्याबाबतच्या सूचना कृषी आयुक्तांनी दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार कोणकोणत्या जिल्ह्यांचा आराखडा तयार करण्यात आला आहे, या आराखड्यामध्ये कोणकोणत्या बाबींचा/योजनांचा प्राधान्याने समावेश करण्यात आला आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील (१७-०५-२०१८) :** (१) होय.

(२) कृषी विभागाच्या सर्व योजनांचा समावेश करुन राज्यातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी फळे व भाज्यांची विक्री व्यवस्था, प्रक्रिया आणि फळांच्या

निर्यातीवर भर देऊन सर्व जिल्हयांचे पुढील ५ वर्षांचे आराखडे तयार करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील महाविद्यालयांमधील प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(४९) ४११२२ (०५-०४-२०१८). श्री.आनंदराव पाटील** : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या दिनांक १६ सप्टेंबर, २०१६ च्या शासन निर्णयानुसार सुधारीत आकृतिबंध मंजूर होईपर्यंत राज्यातील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात नवीन पदनिर्मिती व पद भरती करण्यात येणार नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निर्णयामुळे राज्यातील महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांची पदे रिक्त असून त्याचा शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर सुधारीत आकृतिबंधाला मंजूरी देवून राज्यातील महाविद्यालयात पदनिर्मिती व पदभरतीस ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे (०७-०५-२०१८)** : (१) वित्त विभागाच्या दिनांक १६/०९/२०१६ च्या शासन निर्णयान्वये सुधारीत आकृतिबंध मंजूर होईपर्यंत नवीन पदनिर्मितीचे प्रस्ताव सादर करु नयेत असे निदेश देण्यात आलेले आहेत. तसेच दिनांक २५/०५/२०१७ च्या शासन निर्णयानुसार सुधारीत आकृतिबंध मंजूर होईपर्यंत पद भरतीस बंदी आहे.
(२) अंशतः खरे आहे.

अधिव्याख्यात्यांच्या रिक्त पदांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शैक्षणिक काम पूर्ण करण्यासाठी तासिका तत्वावरील अभ्यागत अधिव्याख्याता नियुक्तीची तरतुद आहे. त्यानुसार तासिका तत्वावर

अधिव्याख्याता नियुक्ती करुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याची काळजी घेण्यात येते.
(३) व (४) वित्त विभागाच्या सूचनांनुसार पदांच्या आढाव्यास / आकृतीबंधास अंतिम मंजूरी मिळण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे. महत्वाची रिक्त पदे भरण्यासंदर्भात वित्त विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

---

## पुणे शहरासह ग्रामीण भाग केरोसीनमुक्त करण्याबाबत

**(५०) ४११३५ (०५-०४-२०१८). श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरासह ग्रामीण भाग शंभर टक्के केरोसीनमुक्त करण्याचा शासनाने निर्णय घेतला असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट (११-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.
माहे एप्रिल, २०१७ पासून पुणे शहर केरोसिन मुक्त करण्यात आलेले आहे. तथापि, ग्रामीण भाग केरोसिनमुक्त करण्याबाबत कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

वि.प. ३ (55)

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.